विद्यमाने शेतकरी मेळावा व विटभटटी धारकांचा मेळावा घेण्यात येत असतो.

भु.औ.वि.केंद्राच्या लक्षणीय कामगिरीची दखल घेवून मुख्य कार्यालय, नवी मुंबई यांनी या केंद्राला माहे जून २००८ मध्ये तत्कालीन व्यवस्थापकीय संचालक, श्री. अजय मेहता यांच्या हस्ते व माहे जून २००९ चा व्यवस्थापकीय संचालक, श्री. सुब्रत रथो यांच्या हस्ते उत्तम दर्जाची कामगिरी हे पारितोषिक देण्यात आलेले आहे.

हया केंद्रातील वसाहतीमधील वातावरण हे एकमेकाशी सौहार्दपूर्ण व सहकार्याचे आहे. अधिकारी, कर्मचारी यांचे मनोरंजनाकरिता बालोद्यान, चांदणीगार्ड, दीपलॉन, जिमखाना, वाचनालय, सांस्कृतिक कार्यक्रमाकरिता जुना क्लब अशा एक ना अनेक सुविधांची निर्मिती करण्यात आलेली आहे. तसेच कर्मचाऱ्यांच्या आरोग्याच्या दुष्टीने वारंवार तपासणी करण्यात येते. व योग्य त्या सुविधांसह दवाखाना वसाहतीत उपलब्ध आहे. राष्ट्रीय सणां प्रमाणेच दरवर्षी सार्वजनिक उत्सव व महापुरुषांच्या जयंती गणपती उत्सव, शिवाजी महाराज जयंती, डॉ. बाबासाहेब व म. ज्योतिबा फुले जयंती, म. वाल्मीक जयंती इ. मोठया उत्साहाने साजऱ्या करण्यात येतात. याच सोबत वसाहतीमध्ये सार्वजनिक भागवत सप्ताहसुध्दा महाप्रसादासहित साजरा करण्यात येतो. तसेच सर्व संघटना/ युनियन यांचे सोबत ठराविक कालावधीत सांगोपांग चर्चाद्वारे त्यांच्या तक्रारींचे निकारण करण्यात येत असते.

सर्व अधिकारी अभियंता व कर्मचाऱ्यांच्या सहकार्याने विकासाची कास धरुन हे केंद्र नवनवीन मानाचे तुरे आपल्या शिरपेचात खोचेल यात तिळमात्र शंका नाही . पुढील सन २०१० मध्ये उर्जा निर्मिती क्षेत्रात २ X ५०० मे. वॅ. संचाची भर पडणार आहे. त्यामुळे महाराष्ट्राचे औद्योगिक विकासात मोलाची भर पडेल व भु.औ.वि.केंद्र, दीपनगर हे महाराष्ट्राच्या नकाशावर एक मोठे उर्जा स्त्रोत म्हणून गणले. जाईल. अर्थातच याला कारणीभूत आमच्या मुख्यालयातील आमचे आदरणीय व्यवस्थापकीय संचालक श्री. सुब्रत रथो, संचालक ( संचलन ) श्री. मधुकर शेलार , संचालक (प्रकल्प) श्री. ए.टी. डवलेकर, संचालक (वित्त) श्री. गुलाबसिंग गिरासे, कार्यकारी संचालक (संवसु-१ श्री.सी.एस. थोटवे, कार्यकारी संचालक (संवसु-२ ) श्री.व्ही.पी.सिंग,कार्यकारी संचालक (सांघिक नियोजन) श्री. एम.जी. वाघमोडे व कार्यकारी संचालक (मा.सं.) श्री. अरविंद चौधरी या सर्वांचा मोलाचा वाटा आहे. त्यांच्या मार्गदर्शन व सहकार्याशिवाय हे शक्य झाले नसते.

✤✤✤

## खापरखेडा विस्तारीत वीज प्रकल्प येथे आरोग्य तपासणी संपन्न

५०० मेगावॅट खापरखेडा विस्तारीत वीज प्रकल्पात कार्यरत सर्व अधिकारी तसेच कर्मचारीवृंदाची नुकतीच आरोग्य तपासणी करण्यात आली. यामध्ये रक्तगट तपासणी,एक्सरे,रक्तसाखर तपासणी, श्रवण तपासणी,डोळे तपासणी,तसेच वैद्यकिय तज्ञांनी याप्रसंगी मार्गदर्शनातून उपयुक्त माहिती दिली. प्रकल्प व स्थापत्य विभागातील कर्मचा-यांचा उत्स्फूर्त सहभाग होता.

शिबीराच्या यशस्वीतेकरिता श्री.भालचंद्र गोखले, मुख्य महाव्यवस्थापक, श्री.विठ्ठल खटारे, महाव्यवस्थापक, श्री.अरूण पेटकर कार्यकारी अभियंता, श्री.जिचकार उप कार्यकारी अभियंता, श्री.गोडघाटे सहाय्यक अभियंता श्री.चव्हाण यांचे सहकार्य लाभले.

डॉ.दीपक देवतळे नागपूर यांच्या मार्गदर्शनाखाली शिबीराचे आयोजन करण्यात आले. साधारणत: ११० व्यक्तींनी तपासणी करून घेतली.

## नाल्याचे खोदकाम करून दिल्यामुळे पारस येथील शेतक-यांना दिलासा

पारस औष्णिक विद्युत केंद्रातील नाल्याचे पाणी पारस भाग -१ मधील शेतक-यांच्या शेतात पसरत असल्याची तक्रार असल्यामुळे महाव्यवस्थापक औ.वि.केंद्र पारस यांनी स्वत: लक्ष देवून विनाविलंब ३ कि.मी. नाल्याचे खोदकाम करून दिले.व शेतक-यांची समस्या दुर केली याबद्दल येथील सर्व शेतक-यांनी त्यांचे आभार मानले आहेत.

या कामासाठी श्री.नेमाडे महाव्यवस्थापक,पारस औ.वि.केंद्र यांच्या मार्गदशंनाखाली अधीक्षक अभियंता श्री.निखारे ,कार्यकारी अभियंता श्री.दळवी व उपकार्यकारी अभियंता (स्थापत्य) श्री.गलगलीकर यांनी त्वरीत कार्यवाही करून सदर नाल्याचे खोदकाम करून दिले.श्री.लांजूळकर, कंत्राटदार, भुसावळ यांनी हे काम पुर्ण केले.